# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# येशू वादळी समुद्राला शांत करतो




लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Ruth Klassen



60 गोष्टींतील 48 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*



परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.


मराठी

Marathi



येशू आणि त्याचे शिष्य मचव्यात बसून समुद्रातून प्रवास करत असतांना, समुद्रात मोठे वादळ उठले. या वादळामुळे गालिल समुद्र धुमचक्रीने झपाटला.





या प्रकारच्या वादळाने समुद्रातील जहाजे फुटून पाण्यात बुडण्याची शक्यता असते.

वादळामुळे शिष्य फारच घाबरले होते. लाटा मचव्यात येत होत्या, त्यामुळे मचवा पाण्याने भरत होता. परंतू येशू तर वादळात देखिल डोक्याखाली उशी घेऊन झोपले होते.



3

तेंव्हा शिष्य त्याला जागे करत ओरडून म्हणाले, "गुरुजी, गुरुजी, आम्ही बुडत आहोत !"



4

येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला, "अहो, अल्पविश्‍वासी, तुम्ही भित्रे कसे?" मग त्याने घोंगावणाऱ्या वाऱ्याला थांबण्याची... आणि... गर्जणाऱ्या लाटांना शांत होण्याची आज्ञा केली.



5

आणि वादळ अगदी शांत झाले... समुद्र निवांत आणि स्तब्ध झाला. शिष्यांना आश्‍चर्य वाटले व ते म्हणाले, "हा कोणत्या प्रकारचा माणुस आहे की वारे व समुद्रहि ह्याचे ऐकतात !"



6



काही कालावधि नंतर, येशुचा अजून एक व्यस्त दिवस गेला. ५,००० पेक्षा अधिक लोक एका रानातील ठिकाणी येशूच्या मागे-मागे गेले.

7



एका लहान मुलाने त्याच्यासाठी आणलेल्या जेवणाच्या डब्याचा वापर करुन देवाच्या कृपेने येशूने त्या सर्व लोकांना जेवू घातले. आणि आता संध्याकाळ झाली होती. येशूने त्या सर्वांना पाठवून दिले.

8



शिष्यांना देखिल जावे लागले. येशूने त्यांना मचव्यात बसवून त्याच्या आधि गालिल समुद्राच्या पलिकडे जाण्यास त्यांना सांगितले.
9
जेंव्हा त्याने सर्वांना त्याच्यापासून पाठवून दिले, तेंव्हा येशू स्वतः डोंगरावर एकांती प्रार्थना करावयास गेला. आणि रात्र झाल्यावरहि तो तेथे एकटाच होता.
10
समुद्रात वारा समोरुन असल्यामुळे शिष्य समुद्रातील वाऱ्यात अडकून पडले होते. पुष्कळ तास प्रयत्न करुन देखिल वाऱ्याने त्यांना समुद्रातील पाण्यातून प्रवास करण्यास थांबवून ठेवले होते.
11
त्यांना मोठा आश्चर्याचा धक्का बसणार आहे, हे शिष्यांना माहित नव्हते.
12
सकाळच्या तिन ते सहा वाजेच्या दरम्यान, समुद्रातील घोंगावणाऱ्या वाऱ्यात शिष्यांनी काहितरी पाहिले ज्यामुळे ते फार घाबरले.
13
आणि ते भिऊन ओरडले, "हे भूत आहे !" परंतू तो तर त्यांचा प्रभू आणि गुरु, येशू होता, तो पाण्यावरुन चालत त्यांच्याकडे येत होता.
14

येशू त्यांना म्हणाला, "धीर धरा मी आहे; भिऊं नका." तेव्हां पेत्राने उत्तर दिले, "प्रभूजी आपण असाल तर पाण्यावरुन आपणांकडे येण्यास मला सांगा." म्हणून येशूने त्याला म्हटले, "ये." तेंव्हा पेत्राने अगदी साहसीपणे, मचव्यातून पाण्यावर पाय टाकले, आणि पाण्यावरुन येशूकडे चालू लागला.



15



परंतू जेंव्हा त्याने वाहणारा वारा पाहिला, पेत्र घाबरला, आणि पाण्यात बुडू लागला. तेंव्हा तो ओरडून म्हणाला, "प्रभूजी, मला वाचवा !"

16

येशूने लगेच हात पुढे करुन त्याला धारिले व म्हटले, "अरे अल्पविशासी तूं संशय का धरिलास?" आणि मग जेंव्हा पेत्र व प्रभू येशू मचव्यात चढले तेंव्हा वारा पडला.



17

तेंव्हा जे कोणी त्या मचव्यात होते ते आले व त्याच्या पाया पडून म्हणाले, "आपण खरोखर देवाचे पुत्र आहात."



18

येशू वादळी समुद्राला शांत करतो

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

मत्तय ८, मत्तय १४, मार्क ४, लूक ८

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!